दै सामना

# प्रभाग क्र. ४ क मधील जागा ओबीसी महिला प्रवर्गासाठी

## निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुन्हा सोडत

नांदेड, दि. १० (प्रतिनिधी)– महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज पुन्हा ओबीसी प्रवर्गातील महिलांसाठी निश्चित केलेल्या आरक्षणाची सोडत काढण्यात आली. आज काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीमुळे प्रभाग क्र. ४ क मधील जागा ओबीसी महिला प्रवर्गाला सुटली आहे.

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ६ जुलै रोजी आरक्षण सोडत काढण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आरक्षण निश्चितीची प्रक्रिया पार पडली. परंतु ओबीसी महिलांच्या आरक्षणाची निश्चिती चुकली असल्याने प्रभाग क्र. ४ क साठी आज पुन्हा आरक्षण सोडत काढण्यात आली. एकूण २० प्रभागांतील प्रभाग क्र. ४ क ही जागा थेट महिलांसाठी ठेवणे आवश्यक होते. त्यामुळे ही सोडत पुन्हा काढावी, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने दिल्यानंतर आज १० जुलै रोजी ४ क प्रभागासाठी आरक्षण सोडत काढण्यात येऊन ४ क ही जागा ओबीसी महिलांसाठी आरक्षित करण्यात आली. तर उर्वरित जागा या प्रचलित पद्धतीने काढण्यात आल्या. यावेळी मनपा आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त रत्नाकर वाघमारे, कंदेवाड आदींसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या सोडतीसाठी नागरिकांनीही डॉ. शंकरराव चव्हाण सभागृहात गर्दी केली होती.

दै सकाळ

# सुधारित आरक्षणात बदल

## प्रभाग चार, सात, तेरा, १८ मध्ये बदल



### आजपासून हरकती, सूचना

**महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना शासन राजपत्रात मंगळवारी (ता. ११) प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या संदर्भात हरकती व सुचना सादर करण्याचा कालावधी मंगळवार (ता. ११) ते बुधवारी (ता. १९ जुलै) असा नऊ दिवस राहणार आहे. हरकती व सुचना आयुक्तांच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील कक्ष, महापालिकेच्या चारही क्षेत्रीय कार्यालयात सादर करता येतील.**

नांदेड, ता. १० (बातमीदार) : राज्य निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार सोमवारी (ता. दहा) ओबीसी महिला गटासाठी सोडत काढण्यात आली. त्यानुसार अंतिम आरक्षण ठरविण्यात आले असून त्यामध्ये प्रभाग क्रमांक चार (क), सात (ब), १३ (ब) आणि १८ (ब) मध्ये बदल झाला आहे. सर्वसाधारणमध्ये प्रभाग क्रमांक १३ आणि १७ मध्ये बदल झाला आहे.

महापालिकेची येत्या आक्टोबरमध्ये निवडणुक होत असून त्यासाठी गेल्या गुरूवारी (ता. सहा) प्रभाग रचना आणि आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यामध्ये प्रभाग चार (हनुमानगड) मध्ये 'क' ही जागा थेट ओबीसी महिलेसाठी देणे आवश्यक होते ती देण्यात आली नसल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने शुक्रवारी (ता. सात) सूचना केल्या आणि त्यानुसार त्याची यादीही आयुक्तांकडे पाठवून दिली. ११ व्या जागेसाठी उर्वरित दहा प्रभागांतील ११ जागेपैकी एक जागा सोडत काढून आरक्षित करण्याच्या सुचना केल्या. त्यानुसार सोमवारी ओबीसी महिलेच्या एका जागेसाठी पुन्हा सोडत काढण्यात आली. या वेळी आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त रत्नाकर वाघमारे, संतोष कंदेवार, संभाजी वाघमारे उपस्थित होते. नव्याने प्रभाग सात 'ब' आणि १८ 'ब' नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी तर प्रभाग चार 'क' आणि १३ 'ब' हे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असणार आहेत. पूर्वी प्रभाग सात मधील 'क' आणि 'ड' हे सर्वसाधारण होते त्यापैकी 'क' सर्वसाधारण महिलासाठी राखीव राहील तर प्रभाग १३ मधील 'क' सर्वसाधारण महिला आणि 'ड' सर्वसाधारण पूर्वी होते त्यापैकी 'क' देखील सर्वसाधारण राहणार असल्यामुळे प्रभाग १३ मध्ये दोन जागा सर्वसाधारण राहतील, अशी माहिती उपायुक्त कंदेवार यांनी दिली.